

# मेट्रो 3 : प्रकल्पापूर्वीचे १० टक्के काम पूर्ण

## ऑक्टोबरपासून टनेलचे काम होणार सुरू

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाचे काम सुरू झाले असून पावसाळ्यापूर्वी १० टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. यामध्ये टनेल मशीनसाठी खोदकाम व अन्य पूर्वतयारी करण्यात आली असल्याची माहिती एमएमआरसीचे प्रकल्प संचालक सुबोध गुप्ता यांनी गुरुवारी दिली.

३३.५ किमी या भुयारी मेट्रो मार्गिकेमध्ये अनेक अडचणी असून त्यात भूखंडाचा आराखडा, जमिनीखालील विविध वाहिन्या, झाडांची पुनर्लागवड यांचाही समावेश आहे. मागील काही महिन्यांच्या सातत्यपूर्ण कामामुळेच १० टक्के सिव्हिल वर्क पूर्ण करण्यात यश मिळाले असल्याचे गुप्ता यांनी स्पष्ट केले.

यात रोलिंग स्टॉकचे काम अथवा इलेक्ट्रिकल वर्क्स यांचा समावेश आहे. सध्या टनेलचे लॉन्चिंग करण्यासाठी आझाद मैदान, कफ परेड, सायन्स सेंटर, सिद्धिविनायक, नया नगर धारावी, विद्यानगरी, सहार रोड, पाली ग्राऊंड आणि सारीपूत नगर येथे मोठे खड्डे खोदण्यात आले आहेत.

**या प्रकल्पामुळे १० हजार मेट्रीक टन कार्बन डायऑक्साईड उत्सर्जन कमी होणार आहे. यामुळे ५.५४ लाख वाहनांच्या फेऱ्या कमी होणार आहेत, ज्यामुळे २.९५ लाख लिटर इंधनाची दररोज बचत होईल.**

रोलिंग स्टॉक, सिग्नलिंग व ट्रेन कंट्रोल इत्यादी कामांचे कंत्राट जून २०१८ पर्यंत देणे अपेक्षित आहे.

गेल्या जुलै महिन्यात ७ पॅकेजचे काम विविध कंत्राटदारांना सोपवण्यात आले. आरे ते वांद्रे-कुर्ला संकुल येथपर्यंतचा टप्पा २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तर बीकेसी ते कफ परेड हा दुसरा टप्पा २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.